**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
सन २००८-२००९.

| विषय क्रमांक-१ | मंगळवार दिनांक २९/४/२००८ |
|---|---|
| ठराव क्रमांक -१ | मंगळवार दिनांक २९/४/२००८ |

**प्रस्तावाचा विषय** :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक एक मंगळवार दिनांक ८/४/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक दोन गुरूवार दिनांक १७/४/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १ मंगळवार दिनांक८/४/२००८ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक २ गुरूवार दिनांक १७/४/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मागिल सभांचे कार्यवृत्त कायम करणेचा विषय आहे. मागिल सभांमधील विषयांची माहिती सांगावी.

त्याप्रमाणे मा.स्थायी समिती सभा क्रमांक १ मंगळवार दिनांक ८/४/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक २ दिनांक १७/४/२००८ रोजीचे सभेचे अजेंडया वरील विषय सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आले.

मा.सभापती साहेब :- मागिल सभांचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा.सदस्यांनी आपल्या सुचना / दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. शिंदे द.बा.:- मागिल सभांचे इतिवृत्त मंजूर करावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक ८/४/२००८ व दिनांक १७/४/२००८ रोजीचे सभांचे कार्यवृत्तांत सर्वानुमते मंजूर करावे.

**ठराव :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक एक मंगळवार दिनांक ८/४/२००८ व म मा.स्थायी समिती सभा क्रमांक दोन गुरूवार दिनांक १७/४/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री. शेख आिरफ शेख रफिउद्दीन

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-२ मंगळवार दिनांक २९/४/२००८

ठराव क्रमांक -२ मंगळवार दिनांक २९/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्र.क्र. १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौकादरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता :- मा.स्थायी समिती ठराव क्र. ५ दि. २६/१०/२००७
२. प्रशासकीय मान्यता रक्कम रू. :- २०,१६,६१९/-
३. तांत्रिक मान्यता रक्कम रू. :- २०,१६,६१९/-
४. तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन-०७-०८
६. निविदा ( परिशिष्ट 'ब') रक्कम रू. :- १९,३६,१०६/-
७. निविदा प्रसिध्दी तारीख :- २४/११/२००७
८. निविदा विक्री कालावधी :- २७/११/२००७ ते १२/१२/२००७ ( १५ दिवस)
९. निविदा स्विकारण्याची तारीख :- १५/१२/२००७
१०. निविदा उघडण्याची तारीख :- १८/०१/२००८
११. कामाची मुदत :- ६ महिने
१२. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|---|
| १ | श्री. एम.व्ही. दराडे | ११.११% कमी |
| २. | श्री. विजय म्हस्के | ३.४० % कमी |
| ३ | श्री. हर्षद शिंदे | ७.१० % कमी |
| ४ | श्री. संजय चितळकर | २.५ %कमी |
| ५ | श्री. गिरीष खेडकर | १०.२१ %कमी |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने श्री. एम.व्ही. दराडे, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा ११.११% कमी आहे

तरी सदर प्रस्ताव छाननी समिती समोर दिनांक २६/०२/२००८ रोजी ठेवला असता छाननी समितीने सदरची दरसुची सन २००७-०८ नुसार असल्याने ठेकेदाराचा देकार ११.११ % कमी ने मंजूर करणेस शिफारस करण्यात आलेली आहे. उपरोक्त निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवणेकरिता मा.आयुक्त यांनी दि. २९/३/२००८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी सदरची निविदा मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. शिंदे द.बा.:- सदरचे फुटपाथ करावयाच्या साईटची आपण पहाणी करावी. त्या नंतरच सदर प्रकरणी निर्णय घेण्यांत यावा.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदर प्रकरणाची माहिती देणे करिता संबंधीत अभियंते यांना सभेत बोलवावे.

सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख आर.ए.:- शहर अभियंता यांना सभेत बोलवावे.

मा.श्री. शिंदे द.बा.:- माहिती देण्यासाठी संबंधीत इंजिनिअर सभे मध्ये उपस्थित असणे आवश्यक होते.

मा.श्री. तिवारी सु.र.:- सदर कामासाठी जागा आहे का ?

मा.श्री. मैड स.ब. :- संबंधीत प्रकरणाची सविस्तर माहिती सभेत देण्यांत यावी.

सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख आर.ए. :- शहर अभियंता हे आज रजेवर आहेत.

मा.श्री. शिंदे द.बा.:- प्रस्तावाचा माहिती देण्यांसाठी शहर अभियंता अगर संबंधीत इंजिनिअर सभे मध्ये उपस्थित नाहीत. सदर प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घ्यावा. संबंधीत अभियंते यांनी सभेत माहिती देणे साठी उपस्थितीत रहावे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:- प्रस्ताव पुढील सभेत निर्णयासाठी घ्यावा.

मा.सभापती साहेब :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढील सभेत निर्णयासाठी घेण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौका दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता फुटपाथ करणे कामी मागविण्यात आलेल्या निविदादरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

सुचक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-३ मंगळवार दिनांक २९/४/२००८

ठराव क्रमांक -३ मंगळवार दिनांक २९/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे टि.पी. स्किम नं.४ अं.भू.क्र. १२ मधील महालक्ष्मी उदयान विकसीत करणेचे कामाचे इन्टरलॉक पेव्हींग ब्लॉक बसविणे, लॉन लावणे तसेच फ्लॉवर बेड तयार करणेचे कामाचे तिसरे व अंतीम देयक ठेकेदारास अदा करणेस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-महालक्ष्मी उदयान विकसित करणे कामाचे देयक अदा करणे बाबत.

सविनय सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अंतिम भूखंड क्र. १२ टी.पी. स्किम नं.४ मधील महालक्ष्मी उदयान विकसित करणे या कामाकरिता प्रज्ज्वल डेव्हलपर्स, पुर्ण या एजन्सीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरचे काम एकात्मिक शहर विकास योजने अंतर्गत असून त्यास मा.स्थायी समिती ठराव नं. २ दि. ६/८/०५ अन्वये निविदा रकमेपेक्षा ९.५ % जादा याप्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचे अंदाजपत्रक मनपा मार्फत नियुक्त आर्किटेक्ट अजय ठाकुर & असो. औरंगाबाद, यांचे मार्फत तयार करण्यात आलेले आहे.

महालक्ष्मी उदयान विकसित करणे याकामी केलेल्या कामानुसार एकुण दोन अंतरीम देयकान्वये रक्कम रू. १४,४२,८०९/- इतकी अदा करण्यात आलेली आहे.

महालक्ष्मी उदयान विकसित करणे या कामामध्ये लॉन लावणे, फ्लॉवर बेड तयार करणे, पेव्हींग ब्लॉक्स बसविणे इ. कामाचा समावेश आहे. निविदे मध्ये लॉनचे करिता एकुण रू. ३०,०००/- ची मोघम तरतूद करण्यात आली आहे, परंतु त्याचे प्रति चौरस मीटरचे दर नमूद करण्यात आलेले नाहीत.

निविदेतील नकाशामध्ये वर्तुळाकार कांरजाभोवती व सिनियर सिटीझन्सच्या बैठक व्यवस्थेकरिता इंटरलॉकींग पेव्हींग ब्लॉक्स दर्शविण्यात आलेले आहेत, परंतु निविदेतील ( ॲबस्ट्रॅक्ट) अंदाजपत्रकामध्ये इंटर लॉकीग पेव्हींग ब्लॉक्स बसविण्याची तरतूद करण्यात आलेली नाही, तसेच टेंडरमध्ये फ्लॉवर बेड विकसित करणेची तरतूद करण्यात आलेली आहे, परंतु प्रत्यक्षात फ्लॉवर बेड करिता आवश्यक असणा-या घटकांचा समावेश करण्यात आलेला नाही.

टेंडरमधील लॉन लावणे, फ्लॉवर बेड विकसित करणे व इंटर लॉकिंग पेव्हींग ब्लॉक्स बसविणेबाबत त्रुटी आहेत, प्रत्यक्ष काम करतांना महालक्ष्मी उदयानामध्ये लॉन लावणे, फ्लॉवर बेड विकसित करणे व इंटर लॉकिंग ब्लॉक्स बसविणेची कामे करून घेण्यात आलेली आहेत, त्याचा तपशील खालीलप्रमाणे...

| अ.नं. | कामाचा प्रकार | मोजमाप | दर प्रति चौ.मी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | लॉन विकसित करणे (पार्कस् गार्डन डिएसआर सन २००४-०५ | ३६६६.८८ चौ.मी | १६०/- | ५,८६,७००.८०/- |
| २. | फ्लॉवर बेड विकसित करणे( पार्कस् गार्डन डिएसआर सन २००४-०५० | ३१८.६४ चौ.मी | १६०/- | ५०,९८२.४०/- |
| ३ | इंटर लॉकिंग सिमेंट कॉक्रीट पेव्हींग ब्लॉक्स बसविणे ( पार्कस् गार्डन डिएसआर सन ०५-०६ | ६२७.४६ चौ.मी | ४५६/- | २,८६,१२१.७६/- |

महालक्ष्मी उदयान विकसित करणे कामी अतिरिक्त कामे निविदेतील तरतूदीनुसार ( निविदा पुस्तिका पा.नं. २४ बाब के.१४९) मे. प्रज्ज्वल डेव्हलपर्स, पुणे यांचेकडून करून घेण्यात आली आहेत. सदर ठेकेदारास अद्यापपर्यत रू. १४,४२,८१०/- इतके देयक दोन अंतरीक देयकानुसार अदा करण्यात आलेली आहे. मुळ निविदा रक्कम रू. २३,०९,३६४/- इतकी असून त्यावर ९.५० % जादा ( मंजूर टेंडर दराने) एकुण रक्कम रू.२५,२८,७५४/-इतक्या रकमेस मा.स्थायी समिती ठराव नं. ७ दि ६/८/०५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

ठेकेदाराचे अंतिम देयक रू. ९,२३,८०५/- इतक्या रकमेचे तयार करण्यांत आलेले असून एकूण देयक रक्कम रू.२४,५४,४७६/-इतकी होत आहे.सदरची रक्कम ही प्रशासकीय मान्यता रक्कम रू. २५,२८,७५४/- च्या रकमेपेक्षा कमी आहे, त्यामुळे सदर कामी कुठलाही अतिरिक्त खर्च होत नाही.

सदर ठेकेदाराने इकडेस वेळोवळी पत्र व्यवहार करून बिलाची मागणी केली आहे. मुळ निविदेमध्ये इंटर लॉकिंग पेव्हींगचे दर नमूद केलेले नव्हते तसेच लॉन लावणेबाबत रू. १२/- प्रती नगाप्रमाणे दर नमूद केलेले आहेत. परंतु प्रत्यक्षात अशाप्रमाणे मोजमाप घेणे शक्य होत नाही. सन २००५/०६ चे पार्क्स ॲण्ड गार्डनचे दरसुचीमध्ये लॉन लावणेबाबत रू. १६०/- प्रती चौरस मीटर दर नमूद केले असून त्यानुसार देयक तयार करण्यात आले आहे. तसेच फ्लॉवर बेड बाबत मुळ निविदेमध्ये दर नमूद केलेले असून ते देखील पार्क्स & गार्डनचे दरसुचीनुसार देण्यांत आलेले आहेत.

त्यानुसार ३ रे व अंतिम देयक हे इंटरलॉकिग पेव्हींग ब्लॉक बसविणे, लॉन लावणे व फ्लॉवर बेड तयार करणे बाबत प्रत्यक्ष जागेवर झालेल्या कामानुसारच मोजमाप घेवून तयार केलेले आहे.

सदर कामी ठेकेदारास म.न.पा कुठलीही जादा रक्कम अदा करणार नसून निविदेमधील त्रुटी असलेले दरामध्ये फेरबदल करून तात्कालिन दरसुचीनुसार व त्यावर मंजूर टेंडर मधील ९.५ % जादा दर न घेता देयक तयार करण्यात आले.

तरी सदरहू ठेकेदारास महालक्ष्मी उदयान विकसित करणे कामी रू. ९,२३,८०५/- चे अंतिम देयक अदा करणेस कार्योत्तर मंजूरीस्तव मा.स्थायी समिती कडे सादर करणेबाबत रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे टि.पी. स्किम नं.४ अं.भू.क्र. १२ मधील महालक्ष्मी उदयान विकसीत करणेचे कामाचे इन्टरलॉक पेव्हींग ब्लॉक बसविणे, लॉन लावणे तसेच फ्लॉवर बेड तयार करणेचे कामाचे तिसरे व अंतीम देयक ठेकेदारास अदा करणेस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- प्रस्तावाची माहिती देणे साठी संबंधीत इंजिनिअर उपस्थित नाहीत.

मा.श्री. तिवारी सु.र. :- प्रस्ताव पुढील सभेत निर्णयासाठी घेण्यांत यावा.

मा.श्री.मैड स.ब. :- संबंधीत इंजिनिअर उपस्थित नाहीत. स्थायी समिती महत्वाची असूनही सभे पुढील प्रस्तावाची माहिती देणे साठी संबंधीत इंजिनिअर उपस्थित नाहीत.

सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख आर.ए. :- शहर अभियंता श्री. पालवे हे आज रजेवर आहेत.

मा.श्री. मैड स.ब. :- श्री. पालवे साहेब सोडून सर्व इंजिनिअर यांना कारणे दाखवा. नोटीस काढणेत यावी. स्थायी समितीची सभा महत्वाची असूनही ते सभेत उपस्थित नाहीत.

सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख आर.ए. :- श्री. सोनटक्के इंजिनिअर , श्री. मेहत्रे इंजि. आलेले आहेत.

मा.सभापती साहेब :- त्यांना सभे मध्ये बोलावण्यात यावे.

त्या प्रमाणे शाखा अभियंता श्री.सोनटक्केव्ही.जी.,श्री.मेहत्रे आर.जी.हे सभेत मध्ये उपस्थित झाले.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र. १२ चे फुटपाथचे प्रस्तावाची माहिती आपणांस देता येईल का ?

शाखा अभियंता श्री. सोनटक्के :- नाही मला माहिती सांगता येणार नाही.

मा.सभापती साहेब :- महालक्ष्मी गार्डन विषयी प्रस्तावाची माहिती द्यावी.

शाखा अभियंता श्री. मेहत्रे आर.जी. :- महालक्ष्मी गार्डनचे सदर कामाचे साडे तेवीस लाखाचे टेंडर रकमे प्रमाणे काम होते त्यांचे चौदा लाखाचे पेमेंट केलेले आहे. सदर बगीचाचे कामाचे टेंडर प्रमाणे लॉन लावणे पेव्हींग ब्लॉक्स बसविणे,फ्लॉवर बेड तयार करणे इत्यादी काम होते.कामाचे एस्टीमेंट करतांना आर्किटेक्ट यांनी रेट चुकीचे लावले होते.त्या मध्ये इंन्टरलॉक पेव्हींगचे दर नमुद नव्हते.निविदेतील त्रुटी असलेले दरामध्ये तत्कालीन दरसुची नुसार सुधारीत एस्टीमेंट नुसार देयक तयार करणेत आलेले आहे.सदर कामी ठेकेदारास कुठेलीही जादा रक्कम अदा करणार नसून देयक अदा करणेस कार्योत्तर मंजूरी साठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे टि.पी. स्किम नं.४ अं.भू.क्र. १२ मधील महालक्ष्मी उदयान विकसीत करणेचे कामाचे इन्टरलॉक पेव्हींग ब्लॉक बसविणे, लॉन लावणे तसेच फ्लॉवर बेड तयार करणेचे कामाचे तिसरे व अंतीम देयक प्रज्ज्वल डेव्हलपर्स, पुणे यांना अदा करणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री शिंदे दशरथ बाबु.

अनुमोदक :- मा.श्री शेख आरिफ शेख रफिउद्दीन

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-४ मंगळवार दिनांक २९/४/२००८

ठराव क्रमांक -४ मंगळवार दिनांक २९/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील बुरूडगांव , सारसनगर उपविभाग, नगरकल्याण रोड वरील आदर्शनगर, मेघनंद कॉलनी, केडगांव भागातील इंदिरानगर, हनुमाननगर भागात टॅन्कर्स द्वारे पाणी पुरवठा करणे करिता भाडे तत्वावर टॅन्कर लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रस्तावना-विषय-महानगरपालिकेच्या बुरूडगांव, सारसनगर उपविभाग, नगर-कल्याण रोड वरील आदर्शनगर,मेघनंद कॉलनी व केडगांव भागातील इंदिरानगर, हनुमान नगर भागात टॅकर्सद्वारे पाणी पुरवठा करणे बाबत भाडे तत्वावर टॅकर लावणेचे मागविण्यात आलेल्या निविदा दराबाबत.

मा.सादर,

विनंती रिपोर्ट की, अ.नगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव, सारसनगर उपविभाग, नगर-कल्याण रोडवरील खानवस्ती, शिंदे मळा आदर्शनगर व इतर वसाहती, केडगांव भागातील इंदिरानगर, हनुमान नगर भागात वार्षिक निविदा पध्दतीने स्पर्धात्मक दर मागवून टॅकर्सद्वारे पाणी पुरवठा करणेत येतो. सद्यस्थितीत..

**बुरूडगांव-** या उपविभागातील पद्मपुरवाडी, वाकोडी रोड वरील वसाहती, आझादनगर दलित वस्ती, आश्रम परिसर, मोढवे मळा, कुलट मळा, शिंदे मळा, पाचारणे मळा आदी भाग तुटक-तुटक असल्याने पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सोय नाही, त्यामुळे सदर भागासाठी १ टॅकर कार्यरत आहे.

**सारसनगर-** उपविभाग हा परिसर फार मोठा असल्याने मुख्य जलवाहिनी अभावी खाली नमुद केलेल्या वसाहतीना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही व काही वसाहतीना जलवाहीन्या असूनही पाणी पुरवठा होत नाही, त्यामुळे सदर भागात २ टॅकर्स कार्यरत आहेत.

यमुनानगर, चिपाडेमळा, वृंदावन कॉ., मधूबन कॉ., कपिलेश्वर कॉ., पंचशील कॉ., मनोरा कॉ., भवानीनगर परिसर,विधाते कॉ, भगवानबाबा नगर, वंजारवाडी, गणेश कॉ., लक्ष्मी कॉ., औसरकर मळा, ढोर वस्ती, एकाडे मळा

वरील दोन्ही भागासाठी बुरूडगांव पाणी पुरवठा योजने अंतर्गत उंच पाण्याची साठवण टाकी बांधणे व इम्पिरियल हॉटेल ते नियोजित पाण्याचे टाकीपर्यत मुख्य जलवाहिनी टाकणेचे काम चालू आहे.सदरची दोन्ही कामे पुर्ण झाल्यानंतर सदर भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल

**केडगांव-** उपविभागातील इंदिरानगर, हनुमाननगर या दलितवस्ती साठी जलवाहिनी असून सदर जलवाहिनी मुख्य जलवाहिनीस जोडणे व सदर ठिकाणी असलेल्या टाकीजवळ पंपहाउत्र्स बांधणेचे प्रस्तावीत आहे. तोपर्यत सदर भागासाठी १ कार्यरत आहे.

**नगर-कल्याण रोड-** वरील खानवस्ती, शिंदेमळा भांबरेवस्ती, कवडेवस्ती इ. परिसर तुटक-तुटक असल्याने पिण्याच्या पाण्याची सोय नाही, या व्यतिरिक्त आदर्शनगर, मेघनंद कॉ., आदर्शनगर, साईराम सोसायटी मध्ये पुरेसा पाणी पुरवठा होत नसल्याने सदर भागासाठी १ टॅकर कार्यरत आहे.

तसेच उन्हाळयाचे दिवसामध्ये पाण्याची टंचाई जाणवणा-या केडगांव व शहरी भागासाठी आवश्यकतेनुसार (सरासरी २ टॅकर्स) टॅकर्स चालू करावे लागतात.

मे. दिपाली ट्रान्सपोर्ट,अ.नगर यांचेमार्फत माहे मार्च ०७ पासून उपरोक्त भागात टॅकर्सद्वारे पाणी पुरवठा करणेत येत आहे. त्यांची मुदत माहे फेब्रुवारी ०८ अखेर संपणार असल्याने पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी टॅकर्स भाडेतत्वावर टॅकर्स लावणेकामी दि.२४/१२/०७ रोजी प्रस्ताव ठेवून सदर कामाची जाहीर निविदा दि. ३/२/०८ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सविस्तर तपशील खालीलप्रमाणे...

१. निविदा प्रसिध्दी तारीख :- ३/२/२००८
२. निविदा विक्री कालावधी :- दि. ४/२/२००८ ते १८/२/२००८ ( १५ दिवस)
३. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. २०/२/२००८
४. निविदा उघडण्याची तारीख :- २५/२/२००८
५. कामाची मुदत :- १२ महिने
६. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे...

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | टॅकर क्षमता | प्रति दिन भाडे | प्रति कि.मी. दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. गाडे ट्रान्सपोर्ट, अ.नगर | १० मे. टन | १०७५/- | ९.७५/- |
| २ | मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर | | १०६५/- | ९.७४/- |
| ३ | मे. बी.एस. लोंढे , अ.नगर | | ११२५/- | ११/- |

वरील तुलणात्मक तक्ताच्या अनुषंगाने मे. गाडे ट्रान्सपोर्ट, अ.नगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे प्रति दिन भाडे रू. १०६५/- व प्रति कि.मी. भाडे रू. ९.७४/- या दराने आलेला आहे. आलेले दराबाबत दि. १४/३/०८ रोजीच्या झालेल्या वाटाघाटीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत दर दिलेले आहे.

| अ.नं. | सुधारीत दर | टॅकर क्षमता | प्रति दिन भाडे | प्रति कि.मी. दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर | १० मे.टन | १०५५/- | ९.७४/- |

सुधारीत दराची शासकीय दराशी तुलना केली असता प्रति दिन भाडे रू. २०.२०/- ने व प्रति कि.मी. भाडे रू. ०.०४/- ने कमी आहे. तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | सुधारीत दर | टॅकर क्षमता | प्रति दिन भाडे | प्रति कि.मी. दर |
|---|---|---|---|---|
| १ | मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर (सुधारीत दर) | १० मे.टन | १०५५/- | ९.७४/- |
| २ | शासकीय दर | १० मे.टन | १०७५.२०/- | ९.७८/- |

तरी मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अ.नगर यांचे वाटाघाटीनुसार म्हणजेच प्रति दिन भाडे रू. १०५५/- व प्रती कि.मी. रू. ९.७४/-दराचा प्रस्ताव अवलोकनार्थ व मंजूरीस्तव निविदा मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस स.सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सभे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील बुरूडगांव , सारसनगर उपविभाग, नगरकल्याण रोड वरील आदर्शनगर, मेघनंद कॉलनी, केडगांव भागातील इंदिरानगर, हनुमाननगर भागात टॅन्कर्स द्वारे पाणी पुरवठा करणे करिता भाडे तत्वावर टॅन्कर लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- जीवनावश्यक व महत्वाचा प्रस्ताव आहे मंजूर करावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- आलेले कमीचे दरास मंजूरी द्यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील बुरूडगांव , सारसनगर उपविभाग, नगरकल्याण रोड वरील आदर्शनगर, मेघनंद कॉलनी, केडगांव भागातील इंदिरानगर, हनुमाननगर भागात टॅन्कर्स द्वारे पाणी पुरवठा करणे करिता भाडे तत्वावर टॅन्कर लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मे. दिपाली ट्रान्सपोर्ट, अहमदनगर यांचे वाटाघाटी नुसार दहा मेट्रीकटन क्षमता असलेल्या टॅन्करचे प्रतिदिन भाडे रूपये १०५५/- ( रूपये एक हजार पंचावन्न फक्त) व प्रति कि.मी. दर रू. ९.७४ ( रूपये नऊ पैसे चौ-याहत्तर फक्त) चे कमीचे दरास मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.श्री.शिंदे दशरथ बाबु

ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-५ मंगळवार दिनांक २९/४/२००८

ठराव क्रमांक -५ मंगळवार दिनांक २९/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ८ मधील अर्चना हॉटेल, वैभव पशुखाद्य व भाग्यादेय मंगल कार्यालया पर्यत १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व टयुबलर पोल टाकणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २५,६२,०८४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.सादर.

अमदनगर महानगरपालिका, अहमदनगर प्रभाग क्र. ८ ब मधील अर्चना हॉटेल ते वैभव पशुखाद्य व भाग्योदय मंगल कार्यालया पर्यत १५० वॅट सोडीयम व्हेपर टयुबलर पोल टाकणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २५,६२,०८४/-(रूपये पंचवीस लाख बासष्ट हजार चौ-यांऐशी मात्र) चे अपेक्षित खर्चास अहवाल मा.आयुक्त साहेबांनी मान्य केला असुन प्रकरण प्रशासकीय मंजूरीसाठी मा. स्थायी समिती कडे मंजूरी करीता मान्यतेस्तव सादर.

येणे प्रमाणे इलेक्ट्रीकल सुपरवायझर यांचा अहवाल असे.दि.४/४/०८
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र.:- कामासाठी निधी उपलभ्द आहे किंवा कसे

श्री. सावळे इंजि. :- सदर कामासाठी निधी उपलभ्द आहे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- प्रशासकीय मंजूरीसाठी प्रस्ताव आहे मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र. ८ मधील अर्चना हॉटेल, वैभव पशुखाद्य व भाग्यादेय मंगल कार्यालया पर्यत १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व टयुबलर पोल टाकणेचे कामास व एस्टीमेंट रूपये २५,६२,०८४/-(रूपये पंचवीस लाख बासष्ठ हजार चौ-याऐंशी फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत करावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु

अनुमोदक :- मा.श्री शेख आरिफ शेख रफिउद्दीन
ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**

सन २००८-२००९.

विषय क्रमांक-६ मंगळवार दिनांक २९/४/२००८

ठराव क्रमांक -६ मंगळवार दिनांक २९/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २००८-२००९ या आर्थिक वर्षा करिता दैनंदिन कामासाठी लागणारे निरनिराळे साहित्य स्टेशनरी, औषधे रसायने वैद्यकीय साहित्य जरूरी प्रमाणे वार्षिक खरेदी साठी जाहीर निविदा दर मागविण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** -विषय- अहमदनगर महानगरपालिकेस सन २००८-२००९ या आर्थिक वर्षा करिता दैनंदिन कामासाठी लागणारे साहित्य जरूरी प्रमाणे खरेदीकामी वर्तमानपत्रात, महानगरपालिका वेबसाईट तसेच महानगरपालिका नोटीस बोर्डवर जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणेस मंजूरी मिळणे बाबत.

टिप्पणी-उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेस सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाकरिता पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, सार्व.बांधकाम विभाग, इलेक्ट्रीक विभाग व इतर सर्व विभागांना लागणारे साहित्य, स्टेशनरी तसेच सर्व दवाखान्यासाठी लागणारी औषधे, रसायणे व वैद्यकीय साहित्य इत्यादी जरूरीप्रमाणे खरेदी करण्यासाठी वार्षिक निविदा दर मागविण्याकरिता जा.नं. स्टोअर विभाग २६१दि. ११/१/२००८, २८१ दि.२८/१/२००८ अन्वये शहर अभियंता, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, यंत्र अभियंता, इलेक्ट्रीक विभाग प्रमुख, मुख्य अग्निशमन अधिक्षक, उदयान अधिक्षक व झोन प्रमुख झोन क्र.१ ते ६ यांना माहिती स्टोअर विभागाकडे देणे बाबत कळविले असता त्यांचेकडून माहिती प्राप्त झालेली आहे.

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षातील मालाची अंदाजे खरेदी किंमत विचारात घेउन्न महाराष्ट्र शासन उदयोग,उर्जा व कामगार विभाग मा.शासन निर्णय क्र. भांखस २००२ / ( २९९७) /उर्जा उदयोग ६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. २८ मार्च २००३ कॉलम नं. ५ मध्ये को-या निविदा प्रपत्राचे दर नमुद केलेले आहेत.

| अ.नं. | मालाचा तपशील | अंदाजे लागणा-या मालाची किमंत | निविदा बयाणा रक्कम | निविदा फ़ॉर्मची किमंत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीसाठी लागणा-या एस. के. एफ़. कंपणीच्या बेअरिंग | ४,००,०००/- | ४,०००/- | ७५०/- |
| २ | ॲलम(तुरटी) ग्रेड-I (ब्लॉक),ब्लिचिंग (TCL) पावडर ग्रेड-I, लिक्वीड क्लोरिन गॅस ९००किलो सिलेंडर. | १०.००.०००/- | १०.०००/- | १०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | Ductile Iron pipe of Class K९with socket and spigot end suitable for push on jointing, with inside cement mortar lining and outside Zinc Coating with finishing layer of Bitumen.The pipes are to be supplied in standard length of ५.५/६.० m and as per the provision in IS ८३२९. व तदसंबंधी लागणारी फ़िटींग | २०,००,०००/- | २०,०००/- | २,०००/ |
| ४ | जंतुनाशक द्रव्य पावडर उदा. डि.डि.व्ही.पी. ७६% इ. सी., ॲबेट ५०% इ. सी.,बेटेक्स लिक्वीड १००० इ.सी., टेमीगार्ड ५० इ.सी., पायरेथ्रम एक्सट्रक्ट २%, हायड्रोक्लोरिक ॲसिड एन/३०, कार्बोफ़िनॉल पावडर, ब्लॅक फ़िनेल आर. डब्लू. सी. १८ इत्यादी. | ७,००,०००/- | ७,०००/- | १०००/- |
| ५ | झोन क्र. १ ते ३ करिता --<br>प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब, सिमेंटचे मेनहोल कव्हर्स फ्रेमसह, सिमेंट<br>मोझॅक बेंचेस, इ. | ४,००,०००/- | ४,०००/- | ७५०/- |
| ६ | झोन क्र. ४ ते ६ करिता --<br>प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब, सिमेंटचेमेनहोल कव्हर्स फ्रेमसह, सिमेंट मोझॅक बेंचेस, इ. | ४,००,०००/- | ४,०००/- | ७५०/- |
| ७ | एन पी २ क्लास व एन पी३ क्लास, हयुमपाईप कॉलर सह, सिमेंट आवारु, सिमेंट मुतारी सिमेंट व्हेंट पाईप, चायना पाईप, संडास भांडे पी.ट्रॅप सह, युरीनल भांडे इ. | ४,००,०००/- | ४,०००/- | ७५०/- |
| ८ | इलेक्ट्रीक साहित्य उदा. मोटर पंप, ट्युब ,स्टार्टर, लॉक होल्डर, चोक, ट्युब पट्टी, सोडीयम बल्प (वॅट -७०,१५०, २५०), सोडीयम चोक, १५०/२५० वॅट सोडीयम इग्नेटर,केबल, इत्यादी. | ३०,००,०००/- | ३०,०००/- | २,०००/ |
| ९ | ISI मार्क MJP प्रमाणीत, स्लुईस व्हाल्व, G.I.पाईप,PVC पाईप,CI पाईप व तदसंबंधी लागणारी फ़िटींग, बोअरीग साहीत्य इत्यादी. | १५,००,०००/- | १५०००/- | २०००/- |
| १० | पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे ए. सी. बी., शन्टरिले, कॉन्टॅक्टरची पॉईंट्कीट, अल्युमिनियम क्रिपींग लग्ज, HRC फ़्युज होल्डर, इत्यादी. | ३,००,०००/- | ३०००/- | ७५०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | महानगरपालिका दवाखान्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी सर्व प्रकारची औषधे, रसायने, व वैद्यकिय साहीत्य इत्यादी. | ३५,००,०००/- | ३५,०००/- | २०००/- |
| १२ | ऑफ़िस व संगणक स्टेशनरी साहित्य :- पांढरा कागद, क्वायर रजिस्टर, टेन्सिल पेपर, डुप्लीकेट बुक, फ़ाईल्स, गम, बॉटल्स, कार्बन पेपर,स्टॅम्प पॅड,टॅग,टाचनी, सुतळी , कुलूप,कार्टेज टोनर, रिबीन, फ़्लॉपी, कॅल्क्युलेटर, प्लॅस्टीक पिशवी, स्टेनो डायरी, संगणक पेपर इ. | ९,००,०००/- | ९,०००/- | १०००/- |
| १३ | झोन क्र. १ ते ३ करिता --<br>खडी,डांबर मिश्रीत माल पॅचिंगसाठी, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्डमुरुम, सॉफ्टमुरुम, तांबड्या विटा, डबर इ. | ३०,००,०००/- | ३०,०००/- | २,०००/- |
| १४ | झोन क्र. ४ ते ६ करिता --<br>खडी,डांबर मिश्रीत माल पॅचिंगसाठी, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्डमुरुम, सॉप्टमुरुम, तांबड्या विटा, डबर इ. | ३०,००,०००/- | ३०,०००/- | २,०००/- |
| १५ | नारळी खराटे ७५० ग्रॅम वजनाचे,. पंखा टाईप गोलाकार झाडू, मोलाचे कुंचे नायलॉन ब्रश,इ. | २,००,०००/- | २,०००/- | ५००/- |
| १६ | लोखंडी कचरा ढकलगाडी, तीनचाकी सायकल रिक्षा, Fiber Urinal Cabin for two seats with water tank having capacity २५० Litrs. etc. | ६,००,०००/- | ६,०००/- | १०००/- |
| १७ | गावरान ज्वारीचा बागायती पालेदारे कडबा, वाढ्यासह ऊस, मका हिरवी गावरान ज्वारीचे कडवळ हिरवे इ. | १,००,०००/- | १,०००/- | २५०/- |
| १८ | लोखंडी पहार, टिकाव, खोरे, दांडे, लोखंडी फावडी, हॅन्ड ग्लोव्हज, गमबुट, सेप्टीश्युज, सेप्टीमास्क, रबरी होजपाईप. बांगडीपाईप, फवारणी पंप, सुतीदोर, प्लास्टिक ताडपत्री, लोखंडीपत्रा, वेल्डींगरॉड, सर्व प्रकारची खिळे, सुतारकामाची हत्यारे, गार्डन कातरी, लॉनमोअरमशीन, बांबुकत्ती चुना फक्की, सिमेंट्पेन्ट,ऑईल बॉन्ड इ. | ५,००,०००/- | ५,०००/- | ७५०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | लोखंडी ट्री गार्ड | ४,००,०००/- | ४,०००/- | ७५०/- |
| २० | ऑफिस फर्निचर स्टील फायबर व लाकडी उदा. लहान मोठे कपाट रॅक, ऑफिस टेबल, केनिंग चेअर, फायबर प्लॅस्टीक चेअर, कॅम्प्युटर टेबल, प्रिंटरटेबल, रिव्हॉल्वींग चेअर,व्हील चेअर इ. | ६,००,०००/- | ६,०००/- | १०००/- |
| २१ | क्रीडा व सांस्कृतीक विभागाकरीता व्यायाम साहित्य व मशिनरी . उदा- इक्लाईड बेंच, डंबेल्स, वेटलिफ्टींग प्लेटा, शोल्डर बार, क्रॅासवर्क मशीन, पॅगडीक मशीन, फोरम्स मशीन, लेगकर्ल एक्स्टेन्शन फ्रन्टाईज मशीन, इत्यादी. | १०,००,०००/- | १०,०००/- | १०००/ |
| २२ | उद्यान विभागाकरिता खते, किटकनाशक, बुरशीनाशक, वृक्ष रोपे,फळझाडे रोपे, शोभेची रोपे, फुलझाडांची रोपे, इत्यादी. | २,००,०००/- | २,०००/- | ५००/- |
| २३ | जेंटस व लेडिज शाल, गावठी कापड, नॅपकिन, टि शर्ट, टोपी, फेटा इत्यदी. | १,००,०००/- | १,०००/- | २५०/- |
| २४ | सत्कार समारंभाकरीता सन्मान चिन्ह साईज १०", १२", १५", | १,००,०००/- | १,०००/- | २५०/- |
| २५ | अग्निशमन विभागासाठी लागणारे साहित्य उदा. पोर्टेबल पंप, वुड कटर, स्प्रेडर, कटर, लाईफ जॉकेट, लाईफ बायोन्सी, ब्रिदींग ॲपराट्स सेट इत्यादी. | १५,००,०००/- | १५०००/- | २०००/- |

उपरोक्तप्रमाणे अ नं. १ ते २५ चे स्वतंत्र गट करुन वार्षिक निविदा दर मागवावे लागतील.

सन २००७-०८ चे वार्षिक निविदा बाबत पारित झालेल्या ठरावाचे कार्यवृत्त कायम करणे विषयी मा. स्थायी समिती सभा क्र. ७ दि. १०/९/२००७ च्या सभेतील मा. स्थायी समिती ठ. क्र. १ दि. १०/९/२००७ ठरावान्वये मा. स्थायी समिती सभा दिनांक ३/८/२००७ रोजी सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी सभेमध्ये झ ाालेल्या साधक बाधक चर्चेनुसार ठरविण्यात येते की, पुढील वर्षाचे वार्षिक खरेदीकामी जाहीर निविदा दर मागवितांना मान्यताप्राप्त कंपनीचे ऑथराईज डिलर, सब डिलर यांचेच निविदा दर स्वीकारले जातील अशी अट नमुद करुन जाहीर निविदा दर मागविण्यात यावेत. मा. स्थायी समिती सभा दि. ३/८/२००७ रोजीचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.असा ठराव पारित झालेला आहे.

सदर ठरावाप्रमाणे जाहिर निविदा दर मागविताना मान्यता प्राप्त उत्पादक कंपनी व त्यांचे ऑथराईज डिलर,सब डिलर यांचेच निविदादर स्वीकारले जातील अशी अट नमुद करुन निविदा मागविण्यास उपरोक्तपैकी अ.नं. १ ते ८ करिता स्पर्धात्मकदृष्या तुलणा करणेकामी कमीतकमी तीन या प्रमाणे निविदा प्राप्त होवू शकतील मात्र अ.नं.१ ते २५ पैकी अ. नं. ९ ते १२ करिता अनेक उत्पादित कंपणीचे निविदा दर मागविलेले असल्याने प्रत्येक कंपनी करिता स्पर्धात्मकदृष्या तुलना करणेकामी कमीत कमी तीन याप्रमाणे निविदा प्राप्त होवू शकणार नसून व अ.नं. ९ ते २५ चा माल विक्री करणारे परवानाधारक अनेक पुरवठादार आहेत.

अ. नं. ५ ते ६ व १३ ते १४ करिता माल लवकरात लवकर प्राप्त होण्यच्या दृष्टीने झोन क्र. १ ते ३ करिता व झोन क्र. ४ ते ६ करिता स्वतंत्र गट करुन स्वतंत्र पुरवठादार नेमणे कामी मा.शहर अभियंता व मा. उपायुक्त (कर) यांनी सुचीत केलेले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे अ. नं.१ ते २५ चे स्वतंत्र गट करुन त्या पैकी अं, नं. १ ते ८ बाबत जाहिर टेंडर नोटीस मध्ये मान्यता प्राप्त उत्पादक कंपनी व त्यांचे ऑथराईज डिलर ,सब डिलर यांचेच निविदा दर स्विकारले जातील. अशी अट नमुद करुन व उर्वरीत अ. नं.९ ते २५ बाबत स्पर्धात्मक दृष्ट्या दराची तुलना करणेकामी जास्तीत जास्त निविदा प्राप्त होण्याकरीता जाहिर टेंडर नोटीसमध्ये,उत्पादक, ऑथराईज डिलर ,सब डिलर, पुरवठादार यांचेकडून निविदा फ़ॉर्म मधील अटी शर्तीनुसार दोन (२) लिफ़ाफ़े पध्दतीने सिलबंद निविदा वर्तमान पत्रात,महानगरपालिका वेब साईट व महानगरपालिका नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन वार्षीक निविदा दर मागविणेस मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला असता -

त्यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,'निविदा प्रसिध्द करणेस मान्यतेस्तव'
मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,'वार्षीक निविदा मागविणेस हरकत नाही'.
मा.उपायुक्त (कर)यांचा अभिप्राय की,'मुख्यलेखधिकारी यांचे अभिप्रायानुसार वार्षीक निविदा मागविणेच्या मंजूरीस्तव मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य' व त्यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सविनय सादर.
अंदाजपत्रकीय तरतूद-सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२ दि.२०/२/२००८ अन्वये अंदाजपत्रकीय तरतूदीस मंजूरी दिलेली आहे.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख श्री.ए.जी. जाधव यांचा अहवाल असे. दि.२३/४/०८
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्येे वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्येे झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- ऑफिशियल प्रस्ताव आहे मंजूर करावा.
मा.श्री. शिंदे द.बा. :- प्रस्ताव मंजूर करावा.
मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्टानुसार प्रस्ताव मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेस सन२००८-२००९या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी लागणारे निरनिराळे साहित्य स्टेशनरी,औषधे रसायने वैद्यकीय साहित्य जरूरीप्रमाणे वार्षिक खरेदी साठी जाहीर निविदा दर मागविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.
सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु.
अनुमोदक :- मा.श्री शेख आरिफ शेख रफिउद्दीन.
ऑफिस रिपोर्टानुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-७ मंगळवार दिनांक २९/४/२००८

ठराव क्रमांक -७ मंगळवार दिनांक २९/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव नं. १० दि. ७/१/२००८ अन्वये उर्जा बचती बाबत घेण्यांत आलेल्या निर्णयाचा फेर विचार व्हावा अशा बाबतचे मा.श्री भानुदासजी कोतकर सदस्य, स्थायी समिती, मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सदस्य, स्थायी समिती यांचे दि. ११/३/२००८ चे पत्र मा.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** -विषय- अ.नगर महानगरपालिका हद्दीत अस्तीत्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करिता उर्जा कार्यक्षम उपकरणे वापरणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार दि.७/१/२००८ रोजी झालेल्या स्थायी समितीमध्ये उर्जा कार्यक्षम उपकरणे यांचा वापर करून बी.ओ.टी तत्वावर सदर प्रकल्प राबविणेकामी मगविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता विचारार्थ ठेवणेबाबतचा विषय होता. सदर बाबत स्था.स.ठ.नं. १० दि. ७/१/०८ अन्वये निविदा दर धारक कृपा स्टील इंडस्ट्रीज, नाशिक यांची निविदा मंजूर करणेबाबतचा ठराव पारित करण्यात आलेला होता.

सदर विषयाबाबत प्रशासनाने एशियन इलेक्ट्रॅनिक्स,ठाणे यांची निविदा महानगरपालिकेच्या दृष्टीने आर्थीक हितावह असल्याने या कंपनीची शिफारस केलेली होती. इले. विभागाने सदर प्रस्ताव पूर्ण तपशील वार माहिती न देता सादर केला त्यामुळे सदस्यांचे एनर्जी सेव्हींग्ज वर मनपाला किती टक्के मंजूरीचा हिस्सा याबाबत सविस्तर माहीती न मिळाल्याने कृपा स्टील इंडस्ट्रीजचा ठराव पारीत करण्यांत आला.

परंतू प्रशासनाने त्याबाबत कृपा इंडस्ट्रीजची टेक्नॉलॉजी ही मनपाच्या आर्थिक हिताची नसल्याने अद्याप पर्यत प्रशासनाने अंमलबजावणीची कार्यवाही केलेली नाही. वास्तविक कृपा स्टील इंडस्ट्रीज, नाशिक यांची असलेली टेक्नॉलॉजी, अहमदनगर महानगरपालिकेत असलेल्या स्ट्रीट लाईट करीता सुयोग्य नाही. सदर सिस्टीम अंडरग्राउंड साठी योग्य असू शकते. तसेच समितीत त्यांनी कोणत्याही नवीन फिटींग न लावता केवळ टायमर लावुन सेव्हींग करण्याचे सांगितले होते. तसेच त्याचा आजपर्यत कोणत्याही महानगरपालिकेत प्रोजेक्ट कार्यान्वीत नाही.

आपल्याकडे १ वर्षापासून सदर विषयाबाबत कार्यवाही चालू असुन अद्यापपर्यत सदरचा विषय मार्गी लागलेला नाही.

तरी सदरचा विषय मार्गी लावणेसाठी येत्या स्था.स. मध्ये सविस्तर माहिती सह चर्चेला घेण्यांत यावा ही विनंती.

येणे प्रमाणे मा.श्री. भानुदासजी कोतकर व मा.श्री. शेख आरिफ शे.रफिउद्दीन सदस्य स्थायी समिती यांची यादी असे दि.११/३/०८

सबब मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मा.स्थायी समितीचे दिनांक ७/१/२००८ रोजीचे सभे मध्ये आपण कृपा स्टील इंडस्ट्रीज,नाशिक यांचे निविदा दरास मंजूरी दिलेली होती.

मा.सभापती साहेब :- सदरचे कृपा स्ट्रील इंडस्ट्रीज यांची निविदा म.न.पा.चे दृष्टीने आर्थीक हिताची व आपले म.न.पा. साठी सुयोग्य नसलेने पुढील कार्यवाही झालेली नाही. तीन महिन्यानंतर मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठरावात बदल करण्याचे आपले अधिकारा नुसार व मा.स्थायी समिती सदस्याचे पत्रानुसार सदर विषय सभे मध्ये निर्णयासाठी घेतला आहे. एक वर्षापासून सदर विषय मार्गी लागलेला नाही हा विषय मनपाचे दृष्टीने उपयुक्त आहे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- सदर प्रकारणी आयुक्त साहेबांनी काय अभिप्राय दिला आहे.

इले.सुपरवायझर श्री. सावळे इंजि. :- सदरचे प्रस्तावावर प्राप्त तीन ही निविदा पैकी एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांची निविदा कृपा स्टील इंडस्ट्रीज व सहस्त्रोनिक इंडस्ट्रीज यांनी वीज बचती विषयी मांडलेल्या मुद्दा पेक्षा ही मनपा चे दृष्टीने आर्थिक हिताची वाटते वीज बचत प्रकल्पाचे काम एशियन इलेक्ट्रॉनिक्स या कंपणीस देणे मनपाचे दृष्टीने योग्य होईल. वीज बचत प्रकल्पाचे काम रिपोर्टात नमुद केलेल्या अटी शर्ती प्रमाणे संबंधीत एजन्सी कडून करून घेणेस व एजन्सी ठरविणे कामी मा.स्थायी समिती कडेस मंजूरीस्तव पाठविणे बाबत मा.उपायुक्त साहेब यांनी वरील "अ" प्रमाणे अभिप्राय दिलेला असून मा.आयुक्त साहेब यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे तो असा

१. तीनही कंपनीची टेक्नॉलॉजी वेगवेगळी आहे.ती पाहण्यासाठी आपल्याकडे सक्षम यंत्रणा दिसून येत नाही.
२. सदरचे टेंडर हे BOT Basd तत्वावर आहे ESCO प्रोजेक्ट नाही.
३. करारनामा हा महानगरपालिकेच्या अटीनुसारच करणे बंधनकारक राहील. त्यात ESCO अकौंन्ट राहणार नाही.
४. कोणत्याही परिस्थितीत आता मिळणारा रोडवरील लाईटचा प्रकाश कमी होता कामा नये.
५. तसेच मनपाच्या आताच्या फिटींग्ज जवळजवळ (१३०००) आहेतत्याचे काय करणार ? त्याचा काही प्लॅन सादर केलेला नाही.
६. कार्बन क्रेडीट बद्यल सर्व रक्कम ही महानगरपालिकेस मिळाली पाहीजे.
७. या सर्व योजनेमध्ये महानगरपालिकेचा कोणतीही खर्च राहणार नाही. उलट यात महानगरपालिकेचा फायदाच झाला पाहीजे तसेच नागरीकांना जी सेवा आता मिळते किंवा आतापेक्षाही जास्त मिळाली पाहीजे.
८. सर्व फिक्शचर म्हणजेच बल्ब व इतर सर्व मटेरीयल संबधीत कंपनीनेच वेळच्यावेळी बसवावीत त्याचा कोणताही मोबदला महानगरपालिका देणार नाही.
९. या करारनाम्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज कंपनीस काढता येणार नाही.

या सर्व गोष्टीचा विचार करून निर्णय व्हावा अशाबाबत अभिप्राय दिलेला आहे.कृपा स्टील इंडस्ट्रीज यांची टेक्नॉलॉजी अंडर ग्राउन्ड साठी योग्य आहे.आपले कडेस अंडरग्राउन्ड सिस्टीम नाही.एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांनी वीज बचती बाबत मांडलेले मुद्दे तसेच य संस्थेने इतर म.न.पा.कडे केलेल्या कामाचा अनुभव पहाता त्यांची निविदा मंजूरी विषयी प्रस्ताव सादर केलेला होता.

मा.श्री. शिंदे द.बा. :- एशियन इले. यांनी इतर म.न.पा. मध्ये अशा प्रकारची कामे केलेली असून त्यांचे अटी शर्ती नुसार करारनामा तत्काळ करून पुढील कार्यवाही तातडीने करावी.

मा.श्री.तिवारी सु.र.:-हा प्रस्ताव तीन महिन्यापूर्वीच मंजूर केला असता तर इतका वेळ गेला नसता.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- सदर कामी एशियन इलेक्ट्रॉनिक्स, ठाणे यांचे निविदा दर मंजूर करावे. ते म.न.पा.च्या दिर्घ मुदतीच्या फायदयाचे गणित केले असता त्यांचा अनुभव तसेच अशा प्रकारच्या मोठया व दिर्घ कालीन चालणा-या कामासाठी आर्थिक व तांत्रिक क्षमता याचा विचार करता आपले मनपाचे फायदयासाठी एशियन इले.ठाणे,यांचे दर मंजूर करावे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- एशियन इलेक्ट्रॉनिक्स ,ठाणे यांचे दर मंजूर करावे.दि. ७/१/२००८ रोजीचे ठरावा मध्ये दुरूस्ती करावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/१/२००८ ठराव क्रमांक दहा नुसार उर्जा बचती विषयी कृपा स्टील इंडस्ट्रीज,नाशिक यांचे निविदास मंजूरी दिलेली आहे. सभेने पारित केलेल्या ठरावा मध्ये तीन महिन्यांचे नंतर फेरबदल करणे बाबतचे नियमानुसार मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/१/२००८ ठराव क्रमांक दहा मध्ये सर्वानुमते पुढील प्रमाणे दुरूस्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

"सभे मधील चर्चे मध्ये सहभागी असलेल्या स्थायी समितीचे सदस्यांचे विचार मत घेउन सर्वानुमते आलेले कमीचे निविदा दर धारक कृपा स्टील इंडस्ट्रीज, नाशिक यांची निविदा मनपाचा आर्थिक फायदा असणारी असल्याने मंजूर करण्यांत येत आहे." या ऐवजी "सदर प्रकरणीचे मुळ रिपोर्टामध्ये प्रशासनाने शिफारस केल्यानुसार महानगरपालिकेच्या दिर्घ मुदतीच्या फायदयाचे गणित केले असता अनुभव तसेच अशा प्रकारच्या मोठया व दिर्घ कालीन चालणा-या कामासाठी आर्थिक व तांत्रिक क्षमता याचा विचार करता मे. एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांची निविदा योग्य असलेने सदर कामीचे प्राप्त निविदा पैकी एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांचे निविदा दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच म.न.पा चा फायदा लक्षात घेता. सदर प्रकरणी पंधरा दिवसाचे आंत तातडीने त्यांचे अटी शर्ती नुसार करार प्रक्रिया पुर्ण करून घेण्यांत यावी." या प्रमाणे दुरूस्ती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करिता उर्जा कार्यक्षम उपकरणे / नवीन तंत्रज्ञान याचा वापर करून बी ओ टी तत्वावर योजना राबविणेस देणे कामी मा.स्थायी समिती सभेने दिनांक ७/१/२००८ रोजी ठराव क्रमांक दहा पारित केलेला आहे. मनपा अधिनियमानुसार पारित केलेल्या ठरावा मध्ये तीन महिन्या नंतर फेरबदल करता येतील या नियमानुसार मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/१/२००८ ठराव क्रमांक दहा मध्ये पुढील प्रमाणे दुरूस्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करिता उर्जा कार्यक्षम उपकरणे / नवीन तंत्रज्ञान याचा वापर करून बी ओ टी तत्वावर योजना राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्टावर "सभे मधील चर्चे मध्ये सहभागी असलेल्या स्थायी समितीचे सदस्यांचे विचार मत घेउन सर्वानुमते आलेले कमीचे निविदा दर धारक कृपा स्टील इंडस्ट्रीज, नाशिक यांची निविदा मनपाचा आर्थिक फायदा
असणारी असल्याने मंजूर करण्यांत येत आहे." या ऐवजी "सदर प्रकरणीचे मुळ रिपोर्टामध्ये प्रशासनाने शिफारस केल्यानुसार महानगरपालिकेच्या दिर्घ मुदतीच्या फायदयाचे गणित केले असता अनुभव तसेच अशा प्रकारच्या मोठया व दिर्घ कालीन चालणा-या कामासाठी आर्थिक व तांत्रिक क्षमता याचा विचार करता मे. एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांची निविदा योग्य असलेने सदर कामीचे प्राप्त निविदा पैकी एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांचे निविदा दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच म.न.पा चा फायदा लक्षात घेता. सदर प्रकरणी पंधरा दिवसाचे आंत तातडीने त्यांचे अटी शर्ती नुसार करार प्रक्रिया पुर्ण करून घेण्यांत यावी. " या प्रमाणे दुरूस्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही तत्काळ करावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.श्री . शिंदे दशरथ बाबु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
सन २००८-२००९.

विषय क्रमांक-८ मंगळवार दिनांक २९/४/२००८

ठराव क्रमांक -८ मंगळवार दिनांक २९/४/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे जकात विभागाकडेस " तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार श्री. प्रकाश बबनराव लोळगे, श्री. रमेश हरीराम शर्मा व श्री. शंकर हसानंद देवानी यांचा अर्ज मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** प्रतिवेदक-१) प्रकाश बबनराव लोळगे,वय-३२ वर्षे मो.नं. ९८२२६१८३०२
रा-रेणावीकर मार्केट, सराफबाजार ,अ.नगर
२) रमेश हरीराम शर्मा, वय-३२ वर्षे मो.नं. ९८६७१८५३१८
रा-आगरकर मळा, स्मृती कॉलनी,अ.नगर
३) शंकर हसानंद देवानी, वय-४२ वर्षे मो.नं. ९२२६२४४२८२
रा-आगरकर मळा, अ.नगर

**संदर्भ :-** दि. ०५/०४/२००८रोजी मा.आयुक्त साहेब, अ.नगर यांना आम्ही दिलेला अर्ज.

**विषय :-** जकात विभागात "तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर नेमणुक करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास सविनय सादर करण्यात येते की, आम्ही अहमदनगर महानगरपालिकेच्या तात्कालीन ठेकेदार ' साई एंटरप्राईजेस' ' सहकारी एजन्सी प्रा.ली.' विविध शहरात ' कोणार्क ','यश एंटरप्राईजेस' या कंपनीमध्ये जकात विभागात विशेष पथकात कार्यरत होतो. दरम्यान काळात आम्ही कंपनीस कायदेशीररित्या जकात वसुली करणेकामी सहकार्य केले आहे. नगर शहरात होणा-या जकात माफियांकडून जकात चोरीबाबत नियंत्रण ठेवून जकात चोरीला आळा बसविला होता. तसेच बाजापेठेत येणा-या मालाची मुळ किंमत आम्हाला माहित आहे. त्यामुळे मालाची कमी किंमत दाखवून कमी जकात करून घेणा-यांवर देखील विशेष नियंत्रण ठेवले होते. जेणेकरून उक्त कंपन्यांच्या जकात वसुलीत वाढ झालेली होती.

सद्यस्थितीत आपण जकात वसुली ही महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत करत आहात. सदर विभागात आम्हाला आपण "तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर घेतल्यास महापालिकेच्या जकातीच्या उत्पन्नात आम्ही निश्चित भरीव वाढ करून देउत्र.

तरी उपरोक्त बाबींवर सहानुभुतिपूर्वक विचार करून आपण आमची जकात विभागात " तज्ञ सल्लागार" म्हणून नेमणूक करावी ही विनंती.

येणे प्रमाणे श्री.प्रकाश लोळगे,श्री.रमेश शर्मा,श्री. शंकर देवानी यांचा अर्ज असे.दि. २२/४/०८
सबब मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे जकात विभागाकडेस " तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार श्री. प्रकाश बबनराव लोळगे, श्री. रमेश हरीराम शर्मा व श्री. शंकर हसानंद देवानी यांचा अर्ज मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- हा विषय मा.स्थायी समिती सभे पुढे घेता येतो का ?

मा.सभापती साहेब :- संबंधीताशी चर्चा करूनच विषय घेतलेला आहे. अर्जदार यांनी पूर्वीचे जकात ठेकेदारा कडेस काम केलेले असून म.न.पाचे उत्पन्नात वाढ करू असे त्यांनी सांगितलेले आहे.

मा.श्री. मैड स.ब. :- आपले म.न.पा.चे कर्मचारी आहेत ना?

मा.सभापती साहेब :- जकात ठेकेदारा मार्फत होणारी जकात व एस्कॉर्टचे वसुली प्रमाणे आता आपले कर्मचा-यामार्फत जकात एस्कॉर्ट ची वसुली होते का?

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :- परिस्थीती सारखी आहे.

मा.सभापती साहेब :- आकडेवारी सांगावी.

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम.:- तेरा ते साडेतेरा लाख प्रमाणे दररोजचा सरासरी भरणा होत आहे. जकात व एस्कॉर्टची आकडेवारी वेगवेगळी काढलेली नाही.

मा.सभापती साहेब :- ५० ते ७५ हजाराने एस्कॉर्टचे वसुलीत फरक पडल्याचे समजते आपण जकात व एस्कॉर्टचे वसुलीची डिटेल लेखी माहिती द्यावी.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- किती फरक येतो.

मा.उपायुक्त डॉ.श्री. जावळे साहेब :- वसुली मध्ये जास्त फरक येत नाही.

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम :- आम्ही नियमित चेकींग करतो.

मा.श्री. मैड स.ब. :- शहर हद्दीत जकात चोरी करणा-या टोळया कार्यरत आहेत.

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :- जकात चुकविलेल्या व्यापा-याकडून दहा पटीने जकात वसुल केली जाते दंडा पोटी ५,४१,०७८/- वसुली केलेली आहे. एका कपडयाच्या व्यापा-याने माल अद्यापी सोडवून नेलेला नाही ती ही रक्कम यात जमा होईल.

मा.सभापती साहेब :- जकात वसुली बाबत कार्य परिस्थीती आहे.

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :- सुरूवातीस आम्हाला त्रास झाला. फोन वरून अमुक अमुक रकम द्यावी. अशी मागणी असायची परंतु मा.आयुक्त साहेब यांनी डी.एस.पी व इतर पोलीस अधिका-यांना सदर प्रकरणाची माहिती दिल्या नंतर सदरचा त्रास कमी झाला आहे.

मा.श्री. मैड स.ब. :- आपण कर्मचा-यांना सिक्युरिटी देउ शकतो का ?

जकात अधिक्षक श्री. पवळे एन.एम. :- होमगार्ड नेमू शकतो खर्च कमी येईल.

मा.श्री. मैड स.ब. :-होम गार्ड नेमावत कर्मचा-यांचे सिक्युरिटीसाठी होमगार्ड नेमावेत.

मा.सभापती साहेब :- मानधनावर अनुभवी व्यक्तीची नेमणूक केल्यास जकात वसुलीत वाढ होणार नाही का ? एस्कॉर्टचे उत्पन्न कमी येते. ५० ते ७५ हजाराचा फरक आहे. इलेक्ट्रीक विभागाकडेस मानधनावर वायरमन भरलेले आहेत. सर्व विभागाकडील कर्मचारी जकात वसुली कमी नेमलेले आहेत. त्यामुळे ऑफिसचे कामासाठी कर्मचारी कमी आहेत. उपकर ट्रेनिंगासाठी आणखी कर्मचारी पाठविले तर ऑफिस कामे पेंडीग रहातील.

मा.सौ. दिघें वि.रा. :- फकिरवाडा विभागासाठी ही कर्मचारी कमी आहेत.

मा.श्री. मैड स.ब. :- या कर्मचा-यांच्या मानधनावरील नेमणूका या कोणत्या बेस वर करणार

मा.सभापती साहेब :- यांनी पूर्वीचे जकात ठेकेदारा कडेस काम केलेले आहे. त्यांचे नेमणूकीने म.न.पा चा तोटा होणार नाही. म.न.पाचे उत्पन्न वाढणेचे दृष्टीने मानधनावर नेमणूक कराव्यात.

मा.श्री. मैड स.ब. :- त्यांनी काही वेडे वाकडे उघ्योग केले तर काय.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- आपणांस तसे आढलेले तर आपण कार्यवाही करू शकतो जाहिरात देउन मानधनावर नेमणूक कराव्यात.

मा.श्री. तिवारी सु.र. :- जकात विभागाकडेस मानधनावर नेमणूक करण्यांस माझा विरोध नोंदवावा.

मा.श्री मैड स.ब. :- बाजार पेठेत जकात वसुली संबंधी अनिष्ठ अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. जकात कर्मचा-यांचे आवश्यकते बाबतची माहिती घ्यावी, सर्व्हे करावा. पुढील सभेत निर्णयासाठी प्रस्ताव ठेवावा.

मा.सभापती साहेब :- सहाय्यक आयुक्त व मुख्य लेखाधिकारी यांनी आपला अभिप्राय द्यावा.

मुख्य लेखाधिकारी श्री. कर्डील पी.बी. :- या प्रकरणी जकात विभागाची टिप्पणी नाही असा प्रस्ताव मंजूरी साठी अनिष्ठ

सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख आर.ए. :- ऑफिस रिपोर्टासह प्रस्ताव सभे पुढे येणे आवश्यक

मा.श्री. शेख आरिफ शे.र. : - पुढील सभेत निर्णयासाठी घ्यावा.

मा.श्री. शिंदे द.बा. :- पुढील सभेमध्ये हा विषय निर्णयासाठी घ्यावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते विषय पुढील सभेत निर्णयासाठी घेणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे जकात विभागाकडेस "तज्ञ सल्लागार" म्हणून मानधनावर नेमणूक मिळणे बाबत अर्जदार श्री. प्रकाश बबनराव लोळगे, श्री. रमेश हरीराम शर्मा व श्री. शंकर हसानंद देवानी यांचा अर्ज पुढील सभेत निर्णयासाठी घेण्यांत यावा.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही/-

अनुमोदक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबु. सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.